Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

**April -2020**

**SPECIAL ISSUE-CCXXVIII (228)**



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
**Dr. Kusmendra Sontakke**
Department of History
Y.D.V.D. Arts, Commerce & Science
College, Teosa Dist.Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Scanned with OKEN Scanner

ISSN : 2278-9308
April 2020

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार व कार्य | प्रा. वसंत मोतीराम राठोड | 1 |
| 2 | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जातिव्यवस्था | हेमंत गणपतराव वरघने | 6 |
| 3 | वेद प्रामाण्यवादी आर्यसमाज और डॉ. बाबासाहेब आंबेडकर के परस्पर सम्बन्धों का विवेचन | डॉ. ओमकुमार टोम्पे | 8 |
| 4 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजीक व धार्मिक कार्य | प्रा. रविंद्र अर्जुन पवार | 16 |
| 5 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सामाजिक चळवळ | प्रा. मंगेश वाहाणे | 21 |
| 6 | भारतीय समाजव्यवस्थेतील बदल आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार | प्रा. पंढरी रामभाउ गोरे | 26 |
| 7 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बौध्द धम्म स्वीकारामागील दृष्टिकोन | सहा. प्रा. दीपक स. वानखडे | 30 |
| 8 | संविधान और बाबासाहैब अम्बेडकर | डॉ. यशवंत डी. मेश्राम | 33 |
| 9 | महिला सक्षमीकरणासाठी संविधनात्मक तरतूदीसंबंधी डॉ. आंबेडकरांचा दृष्टीकोण | महाजन संजय बाबुराव | 38 |
| 10 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वैविध्यपूर्ण कार्य : एक दृष्टीक्षेप | प्रा.डॉ.सौ.उज्ज्वला आर.पाटील | 49 |
| 11 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चलन विषयक विचार | प्रा. डॉ. लखन इंगळे | 54 |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय योगदान | स.प्रा. एम. बी. रेवतकर | 59 |
| 13 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री | प्रा.हरिश्चंद्र जी.बोरकर | 64 |
| 14 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजीक,शैक्षणिक व स्त्रीवादी दृष्टीकोण | प्रा. विजय शंकर वानखेडे | 67 |
| 15 | भारत रत्न डॉ. बाबा साहेब आंबेडकर के आर्थिक एवं सामाजिक विचारों की प्रासंगिकता | नितिन सिंघवी | 72 |
| 16 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य | प्रा.डॉ.अभय श्रीहरी लाकडे | 75 |
| 17 | वैदिक संस्कृति मे नैतिक मूल्य | प्रा.सत्येंद्र संगाप्पा राउत | 79 |
| 18 | आधुनिक भारताच्या विकासात महात्मा गांधीच्या विचाराचे योगदान | प्रा. डॉ. कृष्णा आ. माहुरे | 81 |




Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
April 2020

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सामाजिक चळवळ

प्रा. मंगेश वाहाणे
सहाय्यक प्राध्यापक डॉ. एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स पवनी जिल्हा–भंडारा

## प्रस्तावना

भारतात हजारो वर्षापासून अस्पृश्य समाजाला वंदिस्त करून गुलामीत जीवन जगण्यास बाध्य करण्यात आले होते. भारतात अस्तीत्वात असलेली अस्पृश्यता रोमन साम्राज्यातील गुलामगीरीपेक्षाही अत्यंत वाईट होती. अस्पृश्यता त्रिकालबाधित स्थिती असून जन्मतः जो अस्पृश्य तो मृत्यूपर्यंत अस्पृश्य असा नियमच होता. पुढे वर्ण व्यवस्थेची ईश्वरी तत्वाशी सांगड घालुन प्रत्येक वर्णाला वंदीस्त करण्याचे प्रयत्न झाले. अस्पृश्यांना खालच्या वर्णात समाविष्ट करण्यात आले. उच्चवर्णात जन्मलेल्यांना विशेष अधिकार व सवलती तर अस्पृश्य वर्णात जन्मलेल्यांना सर्व अधिकार व सवलती पासून वंचीत ठेवण्यात आले. वर्णव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी वरिष्ठांनी धर्म, धर्मग्रंथ व देवांचा आधार घेवून निम्म वर्गाला जगण्याचे जणू अधिकारच नाकारले. किंबहुना जनावरापेक्षाही त्यांची वाईट स्थिती केली. ही सामाजीक विषमता भारतात हजारो वर्ष टिकुन होती. निसर्गनिर्मीत पाणवठे, नद्या-नाले व तळ्यांवर पाणी पिण्याचा अधिकार देखील अस्पृश्यांना नव्हता, मंदिरात प्रवेश नाकारण्यात आला. "ठेविले अनंते तैसेची रहावे चित्ती असूदे समाधानी" या हिंदू मानसीकतेतुन मुक्तता होवून धर्म, अंधश्रध्दा, रूढी, परंपरा यांच्या दास्यातुन बाहेर पडून तशा प्रकारची मानसीकता अस्पृश्यांमध्ये निर्माण होणे अत्यावश्यक होते. प्रथमतः यात सुधारणा करण्याचे कार्य प्राचीन काळात तथागत बुद्धाने केल्याचे दिसून येते. त्यांनी कुठलाही भेदभाव न करता सामाजिक समता या न्यायाने सर्वांना एक समान लेखन्याचा प्रयत्न केला. त्यानंतर ब-याच वर्षांनी संत कबीर व पूढे महात्मा ज्योतिबा फुले या समाज सुधारकांनी समाज परिवर्तनासाठी सतत लढा दिला व समाजक्रांतीची ज्योत प्रज्वलित करण्यासाठी जीवनभर संघर्ष केला. महात्मा फुलेंची सत्यशोधक समाजाची चळवळ ही विषमता निर्मूलनाची चळवळ होती, सामाजिक प्रबोधनाची चळवळ होती. या समाज सुधारकांना डॉ. आंबेडकर यांनी आपले गुरू मानून सामाजीक संघर्षाचा लढा अखेरपर्यंत कायम ठेवला.

लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांनी ब्रिटीश सत्तेविरूध्द लढण्यासाठी राजकीय चळवळीला विशेष महत्व दिले. परंतू काही समाज सुधारकांना राजकीय चळवळीयेवजी प्रथमतः सामाजीक चळवळी आवश्यक मानून समाजात सामाजीक परिवर्तन घडविण्याचे कार्य केले. या सुधारकांच्या मते राजकीय चळवळीला बळ हे तेव्हाच येईल जेव्हा सामाजीक परिवर्तन घडून सर्व समाज एकजुट होईल व परकीयांना देश सोडण्यास बाध्य व्हावे लागेल. म्हणूनच तथागत बुद्ध, संत कबीर, महात्मा फुले, न्यायमुर्ती रानडे, आगरकर, लोकहितवादी या समाजसुधाकरांच्या सामाजिक चळवळीचा प्रभाव डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक चळवळीवर पडल्याचे दिसून येते.

## महाडच्या चवदार तळ्याचे आंदोलन

महाडचा संग्राम हा क्रांतीचा आरंभ होता. डॉ. आंबेडकरांनी महाडमधून दलितांच्या मुक्तिलढयाचे निशाण रोवले. जणूकाही विद्रोहाचे पाणीच पेटले. होते. वर्षानुवर्षे गुलामांचे जिणे जगणारा समाज याच



Scanned with OKEN Scanner